**<u>नियमित दिवाणी मुकदमा क्र.२३/२०१९ मधील निशाण २५ वरील आदेश</u>**

१. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

२. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

३. प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचे निशाण २५ येथील अर्जात कथन केले आहे की, त्यांची आर्थिक परिस्थिती अगदी बिकट असल्यामुळे आवश्यक खर्चासाठी पैशाची व्यवस्था न झाल्यामुळे त्यांना वेळेत कैफियत देता आली नाही. त्यांची कैफियत/म्हणणे अभिलेखावर दाखल होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्यांचे नुकसान होणार आहे. त्यांनी कधीही निष्काळजीपणा केलेला नाही. प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, प्रतिवादी यांचा प्रस्तूत अर्ज आहे.

४. सदर अर्जावर वादीने म्हणणे देऊन कथन केले की, प्रस्तूत अर्ज खोटा व खोडसाळ आहे. प्रतिवादी यांचे अर्जातील कारण संयुक्तीक नाही. तसेच प्रतिवादी यांनी निष्काळजीपणा केला आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५. प्रतिवादी यांना दिनांक १५/५/२०१९ रोजी समन्स बजावणी झाली आहे. सदर कामी प्रतिवादी यांचे विरुध्द दिनांक २२/७/२०१९ रोजी विना कैफियत आदेश झाला आहे. त्यानंतर सुमारे ४ महिने इतक्या विलंबाने म्हणजेच दिनांक १३/११/२०१९ रोजी प्रस्तूत अर्ज दिला आहे. प्रस्तुत दावा ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. तसेच, प्रस्तूत दावा अद्याप तजवीज बोर्डावर प्रलंबित असून चौकशीला आलेला नाही. वादातील मुद्दयाचे एकाच वेळी गुणदोषांवर निराकरण होण्याच्या दृष्टीने प्रस्तूत अर्ज मंजूर करणे उचीत ठरणार आहे. तसे न झाल्यास नवीन प्रकरण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. विलंबाबाबत वादीला नुकसान भरपाईसाठी खर्च अदा करण्याचा आदेश प्रतिवादी यांना देता येईल. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहेः–

**<u>आ दे श</u>**

१. प्रतिवादी क्र.१ यांचा निशाण २५ येथील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ यांनी वादी यांस पुढील तारखेस रक्कम रुपये १००/– खर्च अदा करणेच्या अटीवर त्यांचे विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करण्यात येत आहे.

**दिनांकः १०/१/२०२०** **(जी.एम.साधले)**

**ठिकाणः लांजा.** **दिवाणी न्यायाधीश क.स्त.,लांजा,**

**जि.रत्नागिरी.**

Digitally signed by Girish Madhukar Sadhale
Date: 2020.01.10 16:40:50 +0530